# तुम्हाला माहीत आहे का?

- दरवर्षी भारतात सुमारे २,५०,००० व्यक्ती तंबाखू सेवनामुळे होणाऱ्या कर्करोगास बळी पडतात.
- दररोज भारतामध्ये २२०० लोक तंबाखूच्या सेवनामुळे मृत्युमुखी पडतात.
- ४०% कर्करोग तंबाखूच्या सेवनामुळे होतात.
- तंबाखूच्या सेवनामुळे तोंड, नाक, स्वरयंत्र, अन्ननलिका व फुफ्फुसे यांचा कर्करोग होतो.
- तंबाखूमुळे स्वादुपिंड, मूत्राशय, मूत्रपिंड, पोट व गर्भाशयमुखाचा कर्करोग होऊ शकतो.

## तोंडाच्या कर्करोगाचे धोक्याचे इशारे

तोंडाचा कर्करोग होण्यापूर्वी, आपले शरीर काही धोक्याचे इशारे देत असते. त्यांना कर्करोगाची पूर्वावस्था असेही म्हणतात. बहुतेकवेळा त्यांच्यातून तोंडाचा कर्करोग होतो.

**क) ल्यूकोप्लेकिया (तोंडातील सफेद डाग)**



साधारणपणे लोक तंबाखू ज्या ठिकाणी तोंडात ठेवतात तेथे पांढरे चट्टे किंवा डाग आढळतात.

**ख) एरिथ्रोप्लेकिया (तोंडातील लाल चट्टे)**

गुलाबी किंवा लालसर रंगाचे चट्टे आढळतात.



**ग) सबम्यूकस फ़ाइब्रोसिस**

यामध्ये तोंडाची लवचिकता कमी होते व तोंड आतून पूर्णतः सफेद रंगाचे होते. तोंड पूर्णतः उघडता येत नाही व मसालेदार पदार्थ सहन होत नाहीत.

**घ) तोंडातील बरे न होणारे व्रण/जखमा**



ही जखम न दुखणारी असते, बरी होत नाही व वाढतच जाते.

## तंबाखूचे इतर दुष्परिणाम

- हृदयाचे विकार : उच्चरक्तदाब (B.P.), छातीत दुखणे (Angina), हृदयविकाराचा झटका (Heart Attack)
- अर्धांगवायू (Paralysis)
- श्वसनाचे विकार (Bronchitis) - सायनसायटिस, इम्फायसेमा, ब्रॉंकायटिस, दमा (Asthma)
- रक्तवाहिन्यांचे विकार (Peripheral Vascular Diseases) बोटांचे गँगरीन (Gangrene) होणे, चालल्यावर पायांमध्ये चमक येणे, ताकद कमी होणे.
- नपुंसकत्व (Impotence) - पुरुषांना नपुंसकत्त्वाचा धोका असतो.

## तोंडाच्या व घशाच्या कर्करोगाच्या निदानाकरीता चाचण्या

- **बायॉप्सी (Biopsy):** संशयास्पद ठिकाणाहून डॉक्टर छोटासा तुकडा काढतात. त्याची सूक्ष्मदर्शकयंत्राखाली तपासणी केली जाते.
- **इनडायरेक्ट लॅरिंगोस्कोपी :** डॉक्टर दूर्बिणद्वारे स्वरयंत्राचा कॅन्सर आहे की नाही हे तपासतात.
- **छातीचा एक्स–रे (Chest X-ray) :** फुफ्फुसाच्या कर्करोगाचे निदान करण्यासाठी छातीचा एक्स–रे महत्त्वाचा आहे.

## तंबाखूसेवनाविषयी काही गैरसमजूती

- कोणत्याही प्रकारची सिगारेट सुरक्षित नसते. फिल्टरयुक्त, मेंथॉलयुक्त, परदेशी, कमी निकोटीन युक्त सर्वच सिगारेट धोकादायक आहेत.
- पान, जर्दा, गुटखा किंवा मशेरी, कुठल्याही प्रकारे केलेले तंबाखूचे सेवन सुरक्षित नसते.
- विडी ही सिगारेटपेक्षा अधिक धोकादायक असते.